REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# लोककल्पनाबंधाचे वाङ्मयीन सौंदर्य

प्रा. डॉ. राजशेखर शिंदे
मराठी विभाग प्रमुख, दयानंद कला महाविद्यालय, सोलापूर.

**सारांश :**

मानवी समाज अत्यंत प्रगत आहे. तो विकसीत असूनही परिवर्तनशील आणि परंपराप्रिय राहिला आहे. एकेकाळच्या कपोलकल्पित बाबी आज सत्यात उतरलेल्या आहेत. तरीही मानवी समाजाला रुढी, समजुती आणि धारणांचा स्वीकार करावासा वाटतो. हेच त्याच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. मानवाच्या कल्पनेला व सृजनाला अंत नसतो म्हणून साहित्याची निर्मिती अपरिहार्य ठरते. त्यामधील कल्पनाबंधाचे सौंदर्य जीवनाधार देणारे ठरते.

## प्रस्तावना –

साहित्य मानवी आचार, विचार, भावना आणि घटितांचे सार असते. याव्दारे मानवी वर्तनाची शक्यता साहित्यामध्ये आजमावलेली असते. मानवी वर्तन, भाषा, समाजसंस्कृती यांमुळे नियत केले जाते. त्याचीच एक परंपरा बनते. अशा दीर्घ –प्रदीर्घ परंपरामधुनच मानवी इतिहास सिध्द होतो. पूर्वापार परंपरा मानवी जीवन रीतीचे संचित म्हणजे पूर्वापार जीवनव्यवहार, परंपरा जीवन व्यवहाराची विशिष्ट संकल्पना बनते. प्रत्येक राष्ट्राची, धर्माची, समूहाची, प्रदेशाची विशिष्ट परंपरा तयार होते. या परंपरामधून लोककल्पनाबंधही तयार होतात. परंपरा, समजुती. रुढी. कल्पनाबंध यांमुळे मानवी समाजाची जीवनदृष्टी तयार होते. तो दृष्टीकोन परंपरेने पुढील पिढीत संक्रमीत होतो. समाजसंवेदना पूर्वी मौखिक परंपरेने टिकवीली जात असे. आणि आज ही परंपरा अनेक माध्यमाव्दारे टिकविण्याचे प्रयत्न होत आहेत. त्या माध्यमातील वाङ्मय हे अत्यंत विश्वासार्ह, दूरगामी कृतीसह परिणाम साधणारे व पुनःसर्जनक्षमता असणारे साधन आहे. प्रस्तुत ठिकाणी याचा शोध लोककल्पनाबंधाच्या अनुषंगाने घ्यावयाचा आहे.

## लोककल्पनाबंधाचे वाङ्मयीन सौंदर्याचे स्वरुप :

वाङ्मयातील लोककल्पनाबंधाचा अभ्यास हा एक सुंदर प्रत्यय आहे. विशेषतः ग्रामीण जीवनामधील लोकतत्वीय अनुबंधाचा अभ्यास अभ्यासनीय ठरतो. निसर्गामधील तत्वांचा ग्रामजीवनात स्वीकार झालेला असतो. त्यामुळे 'ग्रामीण साहित्या' मध्ये लोककल्पनाबंधाचा आढळ मोठ्या प्रमाणात आहे. 'भुजंग' (शंकर पाटील), 'दवणा'(चि.त्र्य.खानोलकर), उंबरफूल, ( भास्कर चंदनशिव ), 'एक होता कावळा' (राजन गवस),'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी ' (ह.मो.मराठे), 'कावळयांची सुगी' (अर्जुन व्हटकर) या कलाकृती लोककल्पनाबंधाच्या अनुषंगाने अभ्यासण्यासारख्या आहेत.

'भुजंग' ही शंकर पाटलांची लोकप्रिय आणि रसिकप्रिय कथा आहे. तीवर मराठीमध्ये चित्रपटसुध्दा निघालेला आहे. 'भुजंग' या कथेला कृपिसंस्कृतीच्या समस्यांची पार्श्वभूमी आहे. कुटुंबकर्ती स्त्री असेल तर अडीअडचणी बिकट होतात. याची प्रचीती 'भुजंग' मधील नायीकेला येते. नायीका जनाईची पुरती परवड झालेली आहे. तिच्या पदरी कच्ची – बच्ची दोन मुली, एक लहानगा मुलगा आहे. नवऱ्याची तिला काडीची मदत नाही. उलट कामधंदा न करता जे जे खाण्यासारखे आहे ते घशाला येईपर्यंत खाणारा आहे. त्याला भस्म्या रोग झालेला होता. खाल्ले की भस्म. पुन्हा भूक आहेच. अश्या नवऱ्यालाही ती पोसत आहे. त्याच्या भुकेने ती बेजार झालेली आहे. घरची कामं , शेतीची–पुरुषांची कामे गडीमाणूस बनून जनाई काम करते. उसाला, जोंधळयाला पाणी स्वतः देते. तिची थोरली लेक–सुशा बापाला भाकऱ्या करुन कंटाळलेली आहे. ती बाप्पाबद्दल चीड आणि



तिरस्कार व्यक्त करते. आणि '' आएऽऽऽ तु उसाला पानी पाजाला गेल्यावर एक मापटंभर तुरीच वटयात घेऊन खाल्ल्या, चपात्या कराव्यात म्हणून कणीक भिजवून ठेवली तर सगळा गोळाच उचलून न्हेला आणि बसून सारी कणीकच खाऊन टाकली बघ !'' मुलीच्या बोलण्यातून बापाविषयी तिरस्कार व्यक्त होतोच शिवाय जनाईच्या दारिद्र्याची कल्पनाही येते. दैन्य, दारिद्र्य ही 'भुजंग' कथेची पार्श्वभूमी कुठल्याही ग्रामीण कथाकादंबऱ्यात असते अशीच आहे. त्यात नावीन्य नाही. नावीन्य वेगळ्याच गोष्टीत आहे. कथेमधील भुजंग म्हणजे नाग ही नावीन्याची गोष्ट आहे. जनाईला शेतात काम करतांना नाग – साप वारंवार दृष्टीस पडतो. उसाला पाणी देतांना, जोंधळ्याची काढणी करतांना, खुरपतांना अगदी विमानाच्या रौं ऽऽ रौं ऽऽ आवाजासारखा फुत्कारत जनाईच्या समोर येऊन नाग थांबतो. इथे 'भुजंग' कथेचे सौंदर्य आहे. शंकर पाटलांनी या कल्पनाबंधाचा सुरेख आविष्कार केला आहे.

लोकसंस्कृतीमध्ये सापाला काही प्रतिमानके आहेत. तो शेतकऱ्यांचा मित्र समजला जातो. स्त्रिया त्याला आपला भाऊ आणि सखासुध्दा मानतात. शिवाय वयस्क जुनी–जानती मंडळी वयात आलेल्या मुलींना व विधवांना साप शब्द उच्चारु देत नाहीत. वात, लांबड, दावं, जनावर, बाबा, अशा पर्यायी शब्दाने त्याचा उच्चार करावा असे सांगितले जाते. साप पुल्लिंगाकार आहे हे त्यामागील कारण आहे. तो वासनाप्रतीक समजला गेला. तो वासनाप्रतीक म्हणून त्याला प्रियकर किंवा पती म्हणून ओळखले जाते. हे त्याच्या म्हणजे नागाच्या दैहिक रुपावरुन रुढ झालेले संकेत आहेत. हे त्याचे रुपविशेष संकेत जगभर आहेत.पण भारतभर त्याच्याविषयी काही समजुती आहेत. तो आपला पूर्वज आहे; त्याचे आपल्या जमीनजुमल्यावर बारीक लक्ष असते आणि आणि अतोनात प्रेम असते. म्हणून रक्षकाचे काम तो करीत असतो. घरा–वास्तूत कोणी नसतांना तो त्यात फिरत असतो; शेतात फिरत असतो. अशा रक्षणकर्त्या भुजंगाच्या पुन्हा वेगळ्या समजुती असतात. तो कोणाला दंश करीत नसतो; पण दृष्टीस पढणारा घावरुन जातो. त्याला लांब मिशा असतात. पिढ्यान् पिढ्या तो घरादारांचे, शेतीवाढीचे रक्षण करतो. कथेमधील जनाईचा चुलत सासरा म्हणतो; ' आपल्या रानात एक भुजंग आहे–पंधरावीस एकर रान फिरतोय; असं आपल्या वाढवढलांकडून भाऊबंदांनी ऐकलं होतं. ऐकून सागळ्यांना माहीत होत; पण गेल्या काही वर्षात त्याचं नाव कधी निघालं नव्हतं. कधी मुणाशी गाडभेट नव्हती. एक–दोनदा त्याची कात तेवढी रानात आढळली होती. त्यावर त्याचा दम नव्हता. कैक वर्ष त्याचा विसर पडल्यागत झाला होता. अशा समजुती आहेत. जनाईला तो शेतात तर दृष्टीस पडतोच; पण वस्तीवर जाऊनही तिला विश्वास देण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या अशा वागण्याला ती कंटाळली. खंबीरपणे त्याच्या समोर उभी राहून म्हणते; 'तुझ्या भयानं कापनी केली न्हाई तर हे पीक ऱ्हाईल? कुनाचं कुनी नेऊन रातोरात लुटून नेतहल बाबा! टाचा घासतमरायची पाळी येईल माझ्या पोरास्नी! माझ्या मालकाला अडिशिरीच्या भाकरी एका येळेला फुरं पडत नाही. कसं दिस कंठु मगं? काय करुन घालु त्याला?हे बघ; खुळ्या गड्यास्नी द्यायला माझ्याजवळ पैसे नाहीत म्हणून सगळं घरनं कराय लागतो आणि त्यास्नी भ्या दावून हुसकावून लावलंस! म्ना काय म्हनायचं तुला? काय लई शनपना दाखवलारा व्हय ह्यात ? हे तुझां वागणं खऱ्याचं न्हवं. मी खऱ्याची हाय. मला भ्या न्हाई. 'तिच्या या खंबीरपणाने तो फुत्कारुन निघून जातो. फणा काढून जनाईकडे एकटक पाहणारा भुजंग नंतर दिसत नाही. लोकसमजुतीनुसार तो रक्षणकर्ताच वाटतो.

लोकसमजुतीमध्ये भुजंग कामवासनेचे प्रतीक आहे. 'भुजंग' मधील वासनारुपाचेही वाचन करता येते. नवऱ्याला भस्म्या रोग झालेला आहे. त्याचा जनाईला पुरुष म्हणून कसला उपयोग वा मदत नाही. हे कोणी पुरुष हेरुन आहे आणि तिची पाठ तो सोडत नाही. तिच्या मुलींना तो भीती घालतोय. याचा जनाई भावकीत 'भुजंग'असा उल्लेख करते. वासनेचा फणा काढणाऱ्या भुजंगला 'मी खऱ्याची हाय; मला भ्या न्हाई' म्हणते ते वर्तनविषयक स्पष्टीकरण आहे. रक्षणकर्ता भुजंग वस्तीच्या मागे संध्याकाळी दबा धरुन बसतो. जनाई तांब्या घेऊन तिकडे गेल्यानंतर पुन्हा दर्शन देतो. ती त्याची समजूत घालते. 'जशी एक भावाला भण; तशी तुला हाय समज' . लोकजीवनात सापाला पती किंवा प्रियकर असे मानले गेले आहे. 'नागपंचमीच्या सणाला जोडून ज्या लोककथा,व्रतकथा सांगितल्या जातात किंवा 'नागपंचमीच्या वेळी फेराची जीग णी म्हटली जातात, त्यांमधुन नागाचे जे चित्रण येते ते मात्र रुढ स्वरुपाचे नाही. तो स्त्रचा पती किंवा प्रियकर म्हणून न येता तिचा भाऊ म्हणून येतो. या सगळ्या कथा–गीतांमध्ये नागाचे भाऊपण स्वागतशील असते. तर त्याचे नवरा म्हणून येणे मात्र निषेधार्ह असते. नागाच्या भाऊपणाचा अंगिकार आणि त्याचा नवरा असण्याचा निषेध हा केवळ नागपंचमीच्या वेळी' (वि.शिंदे, भूमी, जून–सप्टेंबर 2010,पृ.23)

प्राण्यांच्या प्रमाणे पक्ष्यांनाही लोकजीवनात काही आधार आहे. खरे तर पशुपक्ष्यांच्या आधारामुळे मानवाचे जगणे सुसह्य झाले आहे. पोपट, पारवा, कावळा, मोर, टिटवी, गरुड, गिधाड यांविषयी बऱ्यावाईट समजुती

लोकजीवनात आहेत. कावळा तर मराठी वाङ्मयात फार जुना आहे. अगदी महानुभावीय 'कावळा—चिमणी' ची गोष्ट आहे. ज्ञानेश्वरांच्या विराणीमध्ये 'काऊ' आहे.

पैल तो गे काऊ कोकताहे ।
भाकुन गे माये सांगताहै ।।1।।
उड रे उड रे काऊ ।
तुझो सोन्याने मढवीन पाऊल ।।2।।

हे गुढ अजुनही अनाकलनीय वाटते. अजूनही महानुभावीय वाङ्मय,संत वाङ्मय,पंडिती वाङ्मयासोबत कावळा हा पक्षी आधुनिक साहित्यात प्रतीकात्मक रुपात उरला आहे. समकालीन लेखक राजन गवस यांची 'एक होता कावळा' उत्तम आणि श्रेष्ठ अशी कथा आहे. पंडित मास्तर नोकरीच्या गावात बायकोंच्या जिद्दीमुळे धाकट्या भावाच्या विरोध पत्करुन घर बांधतात. नवीन मुक्कामाच्या पहिल्याच दिवशी भरल्या हौदात कावळा पडतो. त्या कावळ्याला पंडित मास्तर पाण्याबाहेर काढतात. पाण्याबाहेर काढलेल्या कावळ्याला मारुन टाकले. मास्तर सकाळी शाळेला निघतात तेव्हा कावळ्यांचा थवा त्यांच्या डोक्यावरच येतो. मास्तर कसेबसे स्वतःला वाचवतात. आणि कावळे वारंवार मास्तराच्या मागावर थांबून शाळेपर्यंत यायला लागतात. विद्यार्थ्यांच्या संरक्षणाची खबरदारी म्हणून मुख्याध्यापक मास्तरास रजा घ्यायला सांगतात. एका कावळ्यामुळे पंडित मास्तरांच्या जीवनात खूप काही घडते. जग रीत निराळी आहे. त्यामागे काही रुढीशास्त्र आहे.

कावळ्याला भारतीय संस्कृतीमध्ये महत्त्व आहे. मृतकाच्या बाराव्या किंवा तेराव्या दिवसाला कावळा घास शिवण्यासाठी लागतो. महालयात (म्हाळात) कावळा घास शिवण्यासाठी लगातो. श्राध्दालाही कावळा घास शिवत असतो. घासाला कावळा शिवणे महत्त्वाचे समजले जाते. तो लवकर शिवत नसेल तर मृतकाचा जीव कश्यात तरी अडकलेला आहे, असे समजले तो. तो पटकन शिवला तर त्याची कशावरच वासना राहिली नव्हती. कावळ्याच्या शिवण्याने त्याची—मृतकाची जन्मफेऱ्यामधून सुटका झाली, असा समज रुढ आहे. हिंदू धमासंस्कृतीमध्ये माणसाच्या मृत्यूपश्चात जन्मफेऱ्याच्या चक्रातून सुटका झाली की नाही, हे कावळ्याने घास शिवण्या न शिवण्यातून सूचित केले जाते.

कावळ्याच्या विश्वात माणसाला घेऊन काही समजुती आहेत. ते माणसांना महापापी समजतात.जिवंत माणसाला शिवणे म्हणजे पापच. अशा कावळ्याला त्याच्या कुळात स्थान नसते. ते अशा कावळ्याला संपवून टाकतात. जे पंडित मास्तरच्या नवीन घरात घडले. माणसांनी शिवलेल्या कावळ्याला सर्व कावळ्यांनी मिळून मारुन टाकले आणि जिवंत माणसाला 'कावळा शिवणे' हे शुभ मानले जाते. कावळा शिवल्याने 'कावळा शिवल्याचा' सांगावा पाहूणे रावळ्यात धाडला जातो. मग मरण साजरे केले जाते. आयुष्य वाढले अशी त्यामागील सकल्पना आहे. पंडित मास्तर हे पहिल्याच दिवशी पाहतो. पत्नीने पाहुण्यांना कावळा लागल्याचा सांगावा (मृत्यूची बातमी सांगणे) पाठवून बोलावून घेतले होते. मरणाची भीती तर आहेच; पण ते पुढे गेल्याचा आनंद अशा समजांमधून व्यक्त केला जातो.

'एक होता कावळा' या कथेमध्ये आणखी एक लोकसमज आहे. तो समज असा की घर बांधल्यानंतर वास्तुशांत करुन जेवणावळ झाली पाहिजे. त्या शिवाय वास्तुशांत होत नाही किंवा ती वास्तू लाभत नाही. पंडित मास्तरांचे वयस्क सहकारी हेच सांगतात. कावळा मागे लागण्याचा अर्थ त्यांनी वास्तुशांतीशीच लावलेली आहे. नवीन घरात दूध ऊतू जाऊ देणे, चार लोकांना घरात हात धुणे (जेवणे) या गोष्टी प्रसन्नतेशी, तृप्ततेशी जोडलेल्या आहेत. त्याचा एक मानसिक सुपरिणाम होतोच. बऱ्याच लोकसमजुती अशा मानसिक संतुलन साधण्यातून निर्माण झालेल्या आहेत.

लेकसमुहाचे वर्तन नियत करणे यातुन लोकसमजुतीची निर्मिती झालेली दिसते. यासाठी पापभिरुची जोड दिलेली आहे. मनुष्य स्वार्थी असला तरी स्वभावतःच तो समूहात पापभिरु असतो. उंबराचं फुल पापभिरुतेचे उत्तम उदाहरण आहे. काही वृक्षःवेलींना थेट फलधारणा होते. आधी फुले येत नाहीत उंबराच्या झाडांबाबत असे होते. थेट फळे येतात. मानवाने याचा उपयोग जीवनव्यवहार नियत करण्यात केला. पुण्यवान माणसालाच उंबराचे फूल दिसते. ते फूल साधे नसून बैलगाडीच्या चाकाइतके मोठे असते. पुण्यवान होण्यासाठी माणसांचे वर्तन राहावे, असा एक उद्देश यामागे दिसतो.या समजुतीचा भास्कर चंदनशिवांनी अतिशय उत्तम असा कल्पनाबंध निर्माण केला आहे.

'उंबरफूल' ('नवी वारूळे' संग्रहात समाविष्ट) सकस अशी कथा आहे. या कथेत एकापरीने जीवनशास्त्र आहे. आणि प्राचीनांची उपचारपध्दतीची काहीशी कल्पना करता येते.

'उंबरफूल' कथेमध्ये वयात आलेली आवडी आणि जीवनाचा अनुभव घेतलेली आवडीची आई विधवा मंजाक्काकरवी कथाकाराने वाचकांना समृध्द केले आहे. कथेमध्ये पपईचे कच्चे फळ आणि उंबराचे फुल हे दोन पदार्थ आहेत. हे दोन पदार्थ आवडी या मादीशी आणि दाम्या या नपुंसकाशी निगडित आहेत. आवडी मध्यरात्रीला चुलीच्या आरात ठेवलेली कच्ची पपई खातांना आई मंजाक्का पाहते आणि ते समजायचे ते ती समजून घेते. अविवाहित लेकीला ती खोदून खोदून विचारते— 'कोणाचं गं?' 'कोणाचं गं?'लेकीचे उत्तर ऐकून आईला घेरीच येणे बाकी असते. ती 'दाम्याच!' असं उत्तर देते. कसे शक्य आहे? दाम्या तर पुरता नपुंसक होता. बायकांत मिसळणे, बायकांसोबत कामाला जाणे, बायकी वर्तन इत्यादी इत्यादी. मग हे कसं?

आवडी वयात आलेली मुलगी आहे. तारुण्य सुलभ अशा भावना तिच्या मनामध्ये तरंगत राहतात. दाम्या नपुंसक म्हणून त्याचा सर्वत्र निर्धोक संचार दाम्याला आवडी पडलेली स्वप्नं सांगत असेल. त्याच्या शरीरमनाशी झोंबी घेत असेल. या शृंगारचेष्टामधून नपुंसक दाम्याच्या अंगात पुरुषी कार्यभागाची प्रेरणा संचारली आणि फुलांच्या, त्याच्या कळ्यांचा सुगंधाच्या दरवळीशिवाय थेट फलरुपी परिणती दिसून आली. नपुंसकामधील शरिर बदल 'उंबरफूल' या प्रतीकामधून कथाकारांनी दर्शविला आहे.

पपई खातांना अनुभवी मंजाक्का अडलेल्या लेकीला ओळखते. हे पपई औषध फळ म्हणून हजारो वर्षे लोकजीवनात स्थिर आहे. आयुर्वेदात असं सांगितलेलं आहे की, प्रसूतेला अंगावर दूध येत नसेल किंवा पुरेसं नसेल तर कच्चा पपईची भाजी करुन प्रसूतेला द्यावी, दूध येणे म्हणजे प्रसूती होणे, प्रसूतीच्या आधी दूध येत असेल तर गर्भपात होणे नैसर्गीक आहे, असा उलट उपचार आहे. पण या सगळ्या प्रकारात पपई बदनाम झाली. पपई हे उष्णधर्मी फळ आहे, ते खाल्ले की उष्णतेमुळे गर्भपात होतो. ती अधिक उष्ण व्हावी म्हणून निखाऱ्यात, आरात ठेवायची; अपेक्षित परिणाम व्हावाच म्हणून! वस्तुतः आयुर्वेदानुसारच पपई शीतधर्मी व मधुर आहे. कोणत्याही पदार्थाच्या अतिरेकी सेवनातून काही दुष्परिणाम होतात. त्यातुन हा समज रुढ झाला आहे. अशा अर्थाने मराठीमधील अनेक कादंबऱ्यात व कथांत पपईच्या फळाचं प्रयोजन केलेलं दिसून येते.

## संदर्भः

1) विश्वनाथ शिंदेः भूमी, जून ते सप्टेंबर 2010, पृ.23